इंग्रजीत टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद

**देढ नाथू राजा(मृत) कायदेशीर वारासदारांतर्फे .**

विरुद्ध

**एल. अंघा नथू जमाल (मृत) वारासदारांतर्फे व इतर.**

१६ सप्टेंबर १९६९

[न्यायमूर्ति जे. सी. शाह, न्यायमूर्ति व्ही. रामास्वामी आणि न्यायमूर्ति ए. एन. ग्रोव्हर]

पद्धत आणि प्रक्रिया - राज्य पुनर्रचना अधिनियम (१९५६ चा ३७), कलम ५२, ५७ आणि ५९ - सौराष्ट्र भाग ब राज्यातील उच्च न्यायालय - एकल न्यायाधीशांच्या निकालाविरुद्ध द्वि सदस्यीय न्यायमूर्तींच्या खंडपीठात अपील फक्त प्रमाणपत्रासहच अनुज्ञेय - भाग ब राज्य मुंबई राज्यात विलीन झाले आणि भाग ब राज्यातील उच्च न्यायालय बंद करण्यात आले - प्रकरणे मुंबई उच्च न्यायालयात वर्ग केले - लेटर्स पेटंट, खंड १५ - प्रथम अपीलातील एकल न्यायमूर्तींच्या निकालाविरुद्ध प्रमाणपत्राशिवाय अपील दाखल करण्यायोग्य - भाग ब राज्यातील उच्च न्यायालयात प्रथम अपील - विलीनीकरणानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांच्या खंडपीठाकडून प्रकरणे निकाली काढण्यात आली - द्वि सदस्यीय न्यायमूर्तींच्या खंडपीठासमक्ष अपील प्रमाणपत्राशिवाय दाखल केल्या जाऊ शकते का ?

जर न्यायाधीशांनी प्रमाणित केले की प्रकरण अपीलासाठी योग्य आहे तर १९४८ च्या सौराष्ट्र अध्यादेश क्र. २, कलम २२ ए (२) अंतर्गत, त्या उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांच्या निकालावरून सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठात अपील करता येते. १९५६ च्या राज्य पुनर्रचना अधिनियमा अंतर्गत, भाग 'ब' सौराष्ट्र राज्य हे मुंबई राज्यात विलीन करण्यात आले, १ नोव्हेंबर १९५६ पासून सौराष्ट्र उच्च न्यायालय बंद करण्यात आले आणि सौराष्ट्र उच्च न्यायालयासमक्ष प्रलंबित खटले मुंबई उच्च न्यायालयात वर्ग करण्यात आले. या अधिनियमाच्या कलम ५२

अंतर्गत, १ नोव्हेंबर १९५६ नंतर मुंबई उच्च न्यायालयाला अगोदर सौराष्ट्र राज्यातील प्रदेशांच्या संबंधात सौराष्ट्र उच्च न्यायालयाकडे त्या तारखेचे असलेले मूळ, अपीलीय आणि इतर अधिकारक्षेत्र ताबडतोब प्रदान करण्यात आली. १९४८ चा सौराष्ट्र अध्यादेश क्र. २, हा सौराष्ट्र (केंद्र सरकारच्या विषयावरील अधिनियमाचे अनुकूलन आदेश, १९५७) अंतर्गत १ नोव्हेंबर १९५६ पासून निरसीत करण्यात आला आणि सौराष्ट्र उच्च न्यायालयाने केलेल्या कार्यपद्धती आणि प्रक्रियेबाबतचे नियम आणि आदेश १९५६ च्या राज्य पुनर्रचना अधिनियमाच्या कलम ५४ अंतर्गत मुंबई उच्च न्यायालयाने केलेल्या नियमांनुसार १ नोव्हेंबर १९५६ पासून निराकृत करण्यात आले. राज्य पुनर्रचना कलम ५७ चा परिणाम असा झाला आहे की, नवीन मुंबई राज्यातील उच्च न्यायालयाच्या द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाचे अधिकार १ नोव्हेंबर १९५६ च्या अगोदर मुंबई राज्यात लागू असलेल्या कायद्या अंतर्गत द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाच्या अधिकारांसारखेच असतील. मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटची खंड १५, जो अधिनियम १ नोव्हेंबर १९५६ च्या अगोदर मुंबई राज्यात लागू होता, त्यामध्ये अशी तरतूद आहे की, अधीनस्थ न्यायालयाच्या निकालाविरुद्ध झालेल्या प्रथम अपीलात मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायधिशांच्या निकालाविरुद्धची अपील ज्या न्यायधिशांसमक्ष त्याच्या सुनावणी झाली असेल त्या न्यायाधीशांच्या प्रमाणपत्राशिवाय दाखल करता येते. मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटची खंड १५ हे गुजरात उच्च न्यायालयाला देखील लागू होते, जी मुंबई पुनरर्चना अधिनियम, १९६० च्या परिणामस्वरूप स्थापन करण्यात आली.

दिनांक १ नोव्हेंबर १९५६ रोजी सौराष्ट्र उच्च न्यायालयात अधीनस्थ न्यायालयाच्या हुकूमनाम्याविरुद्धची प्रथम अपील जी सौराष्ट्र उच्च न्यायालयात प्रलंबित होती ती मुंबई उच्च न्यायालयाकडे वर्ग करण्यात आली आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांनी ती निकाली काढली. मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटच्या खंड १५ अंतर्गत गुजरात उच्च न्यायालय स्थापनेनंतर गुजरात उच्च

न्यायालयाकडे स्थानांतरित करण्यात आले, परंतु गुजरात उच्च न्यायालयाच्या द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठात अपील वर्ग करण्यात आली , परंतु गुजरात उच्च न्यायालयाने १९४८ च्या सौराष्ट्र अध्यादेश क्र. २ च्या कलम २२ ए अंतर्गत एकल न्यायाधीशांच्या खंडपीठाकडून प्रमाणपत्र नसल्यामुळे सदर अपील अक्षम असल्याचे ठरविले.

या न्यायालयातील अपीलात असा निर्णय घेण्यात आला की -

(१) जेव्हा एकल न्यायाधीश असे प्रमाणित करतील की ते द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठात अपीलासाठी योग्य प्रकरण आहे, हे अधिकार, कोणत्याही कायद्याच्या तरतुदीं विरुद्ध असल्याशिवाय, जेव्हा प्रकरण सुरू झाले तेव्हा त्यासोबतच जोडले गेले असतील तेव्हाच सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांच्या निर्णयाविरुद्ध अपील फक्त तेंव्हाच दाखल करता येईल. गरिकापट्टि विरय्या -विरुद्ध- सुबय्या चौधरी, (१९५७) एस्. सी. आर. ४८८, संदर्भित केले (४४३ अ-ब)

(२) परंतु, १ नोव्हेंबर १९५६ पासून सौराष्ट्र उच्च न्यायालय बंद करण्यात आले, सौराष्ट्र अध्यादेश क्र. २, १९४८ निरसित करण्यात आला आणि सौराष्ट्र उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र मुंबई उच्च न्यायालयाकडे प्रदान करण्यात आले. म्हणून, प्रथम अपीलची सुनावणी घेणाऱ्या उच्च न्यायालयाचा एकल न्यायाधीश यांनी सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश म्हणून नव्हे तर मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश म्हणून सुनावणी घेतली होती. [४४३ बी-सी]

(३) १९५६ च्या राज्य पुनर्रचना अधिनियमच्या कलम ५२ चा अर्थ असा नाही की सौराष्ट्र राज्यातील प्रदेशांच्या संबंधात मुंबई उच्च न्यायालयाला प्रदान करण्यात आलेले अधिकार १ नोव्हेंबर १९५६ रोजी सौराष्ट्रमध्ये लागू असलेल्या

संदर्भात कायद्यान्वये नियंत्रित करायचे होते म्हणून, ते सौराष्ट्र अध्यादेशाच्या कलम २२अ (२) अंतर्गत निर्धारित केलेल्या मर्यादा मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटमध्ये स्पष्टपणे किंवा अंतर्भूत करून समाविष्ट केल्या जात नाही. [४४३ जी-एच; ४४४ सी-डी]

(४) अध्यादेशाच्या कलम २२अ अंतर्गत लावलेले निर्बंध हे केवळ सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाच्या निकालास लागू होते आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाच्या निर्णयास लागू होऊ शकत नाहीत आणि लेटर्स पेटंटच्या खंड १५ अंतर्गत प्रयोज्य अपीलाच्या अधिकाराला प्रतिबंधित करण्यासाठी कार्य करू शकत नाहीत, म्हणून, मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाचा न्यायनिर्णय, राज्य पुनर्रचना अधिनियमाच्या कलम ५७ अंतर्गत, एकल न्यायाधीशाच्या प्रमाणपत्राशिवाय द्वि सदस्यीय खंडपीठात अपीलासाठी बंधनकारक होता. [४४३ डी-एफ].

**दिवाणी अपीलिय अधिकारक्षेत्र: दिवाणी अपील क्र. १४५६ - १९६६.**

गुजरात उच्च न्यायालयाने लेटर्स पेटंट अपील क्र. ८/१९६० मधील ६ एप्रिल १९६४ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णय व आदेशाविरुद्ध अपील.

अपीलकर्त्यांसाठी डी. यू. शाह, पी. सी. भर्तारी आणि जे. बी. दादाचंजी.

उत्तरवादी क्रमांक १ (अ) ते १ (ई) आणि (जी) साठी एस. के. ढोलकीस आणि विनीत कुमार .

**या न्यायालयाचा न्यायनिर्णय न्यायमूर्ति शाह यांच्या द्वारे देण्यात आला:-** या अपीलांना कारणीभूत ठरणारे तथ्य थोडक्यात आणि सरळ आहेत. अपीलकर्त्याने ३ मे १९५१ रोजी पूर्वीचा भाग 'ब' सौराष्ट्र राज्यामधील मोरवी येथील सहायक न्यायाधीशांच्या न्यायालयात एल. अंगो नाथू जमाल आणि सदर अपीलमधील उत्तरवादी क्र. २ आणि

३ विरुद्ध रु. ९,३८७/५/- च्या हुकूमनाम्यासाठी दावा दाखल केला. न्यायचौकशी न्यायालयाने १७ ऑक्टोबर १९५५ रोजी दाव्याचा निकाल दिला. या हुकूमनाम्याविरुद्ध, राजकोट येथील सौराष्ट्र उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले. १ नोव्हेंबर १९५६ रोजी सौराष्ट्र उच्च न्यायालय रद्द करण्यात आले आणि त्या न्यायालयात प्रलंबित असलेली कार्यवाही मुंबई उच्च न्यायालयात वर्ग करण्यात आले. २१ फेब्रुवारी १९५८ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश व्यास यांनी अपील मंजूर केले. त्या आदेशाच्या विरोधात लेटर्स पेटंटच्या खंड १५ अंतर्गत वादीने अपील दाखल केली, परंतु सदर अपील हि न्यायाधीश व्यास यांच्या 'सदर प्रकरणात मुंबई उसाचं न्यायालयाच्या द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठा समक्ष अपील दाखल करण्या योग्य आहे' या आदेशाशिवाय दाखल करण्यात आली होती. १ मे १९६० रोजी मुंबई पुनर्रचना अधिनियम १९६० अंतर्गत अपील गुजरात उच्च न्यायालयाकडे स्थानांतरित करण्यात आले. १९४८ च्या गुजरात उच्च न्यायालयाने असे ठरवले की, सौराष्ट्र अध्यादेश क्रमांक २, च्या कलम २२ ए अंतर्गत प्रकरण उच्च न्यायालयाच्या द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठासमक्ष अपीलासाठी योग्य आहे असे प्रमाणित करणारे आदेश नसल्यामुळे अपील अक्षम आहे. गुजरात उच्च न्यायालयाने दिलेल्या प्रमाणपत्रासह या अपीलाला प्राधान्य देण्यात आले आहे. काठियावाडमधील भारतीय संस्थानांच्या संस्थानिकांनी एकच कार्यकारी, विधिमंडळ आणि न्यायव्यवस्था असलेले संयुक्त सौराष्ट्र राज्य उभारण्यास एकत्र येऊन त्यांच्या भूभागांचे एकीकरण करण्यास सहमती दर्शविली. १९४८ च्या अध्यादेश क्रमांक १, प्रसंविधिक राज्यांच्या प्रशासनाचा भार राजप्रमुखांनी स्वीकारला. राजप्रमुखांनी कराराच्या अनुच्छेद ९ खंड (३) अंतर्गत त्यांना राखीव ठेवलेल्या अधिकारांचा वापर करून सौराष्ट्र राज्यासाठी उच्च न्यायालय स्थापन करण्यासाठी २९ फेब्रुवारी १९४८ पासून लागू होणारा १९४८ चा अध्यादेश २, जारी केला. कलम ३(सी) मध्ये "उच्च न्यायालय" या शब्दाची व्याख्या "या अध्यादेशाने स्थापन आणि गठित केलेले आणि सौराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालय म्हणून कार्य करणारे उच्च न्यायालय" अशी केली आहे. कलम २१ अंतर्गत उच्च न्यायालय हे

राज्यातील सर्वोच्च अपीलीय न्यायालय आणि पुनर्विलोकन न्यायालय राहणार होते आणि या अध्यादेशाखाली किंवा राज्यात लागू असलेल्या कोणत्याही अधिनियमाखाली अपील, पुनर्विलोकन आणि इतर खटले, दिवाणी किंवा फौजदारी खटले चालविणे आणि निकाली काढणे असे अधिकारक्षेत्र त्यांना अधिकार दिले जाणार होते. कलम २२ अंतर्गत उच्च न्यायालय हे संदर्भ न्यायालय देखील होते आणि संदर्भित केलेले सर्व खटले ऐकण्याचे, पुनरिक्षण करण्याचे आणि त्यात सुधारणा करण्याचे आणि निर्धारित करण्याचे अधिकार त्यांना होते. १९५० चा अध्यादेश क्रमांक ५ अंतर्गत कलम २२ ए जोडण्यात आले त्यात अश्या तरतुदी नमूद केल्या गेल्या की :

> "(१) सध्या लागू असलेल्या कोणत्याही अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद करण्यात आली नसेल तरी, उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांनी दिलेल्या कोणत्याही मूळ हुकूमनाम्याविरुद्ध, किंवा कोणत्याही आदेश ज्याच्या विरुद्ध सध्या लागू असलेल्या कोणत्याही कायद्याने अपीलाची तरतूद केली आहे, किंवा भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत एकल न्यायाधीशाने पारित केलेल्या कोणत्याही आदेशविरुद्ध उच्च न्यायालयाच्या द्वि सदस्यीय खंडपीठाकडे अपील करता येईल.
>
> (२) उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाने अपील अधिकारक्षेत्राचा वापर करून दिलेल्या हुकूमनामा किंवा आदेशाबाबत उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांच्या निकालावरून उच्च न्यायालयाच्या इतर द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठासमक्ष प्रकरण अपील दाखल करण्या योग्य आहे असे जर हुकूमनामा किंवा आदेश दिलेल्या न्यायाधीशांनी प्रमाणित केले तर अपील दाखल होऊ शकते."

भारतीय राज्यघटनेनुसार, संयुक्त सौराष्ट्र राज्याचे राज्यक्षेत्र हे सौराष्ट्र भाग 'ब' राज्य म्हणून स्थापन करण्यात आले. १९५६ चा राज्य पुनर्रचना अधिनियम अंतर्गत

सौराष्ट्र राज्याचे राज्यक्षेत्र मुंबई राज्यात विलीन करण्यात आले.

१९५६ च्या राज्य पुनर्रचना अधिनियम च्या कलम ४९ अंतर्गत असे विहित करण्यात आले होते की, नियुक्त दिवसाच्या अगोदर मुंबई राज्याच्या संबंधात अधिकारक्षेत्र वापरणारे उच्च न्यायालय, नियुक्त दिवसापासून नवीन मुंबई राज्यासाठी उच्च न्यायालय म्हणून समजले जाईल. कलम ५०(१) अंतर्गत, नियुक्त दिवसापासून सर्व विद्यमान भाग 'ब' राज्यांच्या उच्च न्यायालयांनी (आवश्यक नसलेल्या काही अपवादांसह) कार्य करणे बंद करावयाचे होते आणि ते बंद करण्यात आले होते. कलम ५२ अंतर्गत असे म्हटले आहे की –

> "नवीन राज्यासाठी उच्च न्यायालयाकडे त्या नवीन राज्यात समाविष्ट असलेल्या प्रदेशांच्या कोणत्याही भागाच्या संबंधात सर्व मूळ, अपीलीय आणि इतर अधिकारक्षेत्र असतील, जी नियुक्त दिवसाच्या अगोदर लागू असलेल्या कायद्यानुसार, त्याच नवीन राज्यात समाविष्ट असलेल्या प्रदेशांच्या त्या भागाच्या संबंधात कोणत्याही उच्च न्यायालयाने किंवा विद्यमान राज्यासाठी न्यायिक आयुक्त न्यायालयाने वापरण्यायोग्य आहे."

कलम ५४ अंतर्गत असे म्हटले आहे की,

> "या भागामधील तरतुदींच्या अधीन राहून, नियुक्त दिवसाच्या अगोदर संबंधीत राज्यासाठी उच्च न्यायालयात कार्यपद्धती आणि प्रक्रियेबाबत लागू असलेला कायदा, आवश्यक ते बदल करून, नवीन राज्यासाठी उच्च न्यायालयाच्या संबंधात लागू होईल, आणि त्यानुसार, नवीन राज्यासाठी उच्च न्यायालयाकडे  संबंधीत राज्यासाठी उच्च न्यायालयाकडे नियुक्त दिवसाच्या अगोदर वापरण्यायोग्य असलेल्या कार्यपद्धती आणि प्रक्रियेबाबत नियम आणि आदेश करण्याचे सर्व असे अधिकार असतील.

अशी तरतूद करण्यात आली आहे की, नियुक्त दिवसाच्या अगोदर संबंधीत राज्यासाठी उच्च न्यायालयात कार्यपद्धती आणि प्रक्रियेबाबत लागू असलेले कोणतेही नियम किंवा आदेश, नवीन राज्यासाठी उच्च न्यायालयाने केलेल्या नियमांनी किंवा आदेशांनी बदलले किंवा रद्द होईपर्यंत, आवश्यक ते बदल करून नवीन राज्यासाठी उच्च न्यायालयात कार्यपद्धतीच्या आणि प्रक्रियेच्या संबंधात लागू होईल, जसे की त्या न्यायालयाने केले आहेत."

कलम ५९ (३) अंतर्गत अशी तरतूद करण्यात आली होती की, नियुक्त दिवसाच्या अगोदर सौराष्ट्र उच्च न्यायालयात किंवा कच्छच्या न्यायिक आयुक्त न्यायालयात प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे मुंबई उच्च न्यायालयाकडे वर्ग करण्यात येईल. कलम ११९ अंतर्गत अशी तरतूद करण्यात आली होती की,

"भाग (II) च्या तरतुदींमुळे नियुक्त दिवसाच्या तात्काळ अगोदर लागू असलेल्या कोणताही कायद्याचा ज्या प्रदेशांवर लागू होत अशा प्रदेशांमध्ये कोणताही बदल केला आहे असे मानले जाणार नाही आणि विद्यमान राज्यांसाठी अशा कोणत्याही कायद्यातील प्रादेशिक संदर्भ अन्यथा प्रदानकरे पर्यंत सक्षम विधिमंडळ किंवा इतर सक्षम प्राधिकारीद्वारे तरतूद न केल्यास, नियुक्त दिवसाच्या तात्काळ अगोदर त्या राज्यातील प्रदेश असा अर्थ आहे असे समजले जाईल."

कलम १२७ अंतर्गत अशी तरतूद करण्यात आली होती की,

"या अधिनियमाच्या तरतुदी कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदिंशी असंगत असल्यातरी प्रभावी ठरतील."

१९५६ च्या राज्य पुनर्रचना अधिनियमाच्या कलम १२० अंतर्गत केंद्रीय सरकारला दिलेल्या अधिकाराचा वापर करून, सौराष्ट्र (केंद्रीय विषयांवरील कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९५७, हा केंद्रीय सरकारने जारी केला. या आदेशाच्या खंड ३

अंतर्गत अशी तरतूद करण्यात आली होती की १९४८ चा सौराष्ट्र अध्यादेश क्र. २, हा १ नोव्हेंबर १९५६ पासून रद्द करण्यात येईल. नवीन राज्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालय नियम, अपीलीय बाजू, १९५० मध्ये नियम २५२-अ आणि २५२-ब जोडले. नियम २५२-अ अंतर्गत अशी तरतूद करण्यात आली होती की,

> "नियुक्त दिवसाच्या अगोदर मुंबई उच्च न्यायालयात कार्यपद्धत आणि प्रक्रियेबाबत लागू असलेले नियम आणि आदेश, वेळोवेळी त्यामध्ये करण्यात आलेल्या बदलांच्या अधीन राहून, उच्च न्यायालयातील कार्यपद्धती आणि प्रक्रियेला लागू होईल."

नियम २५२-ब अंतर्गत अशी तरतूद करण्यात आली होती की,

> "नागपूर, हैदराबाद आणि सौराष्ट्र उच्च न्यायालयांनी आणि न्यायिक आयुक्त न्यायालय, कच्छ याने केलेल्या कार्यपद्धती आणि प्रक्रियेबाबतचे नियम आणि आदेश, १ नोव्हेंबर १९५६ पासून नवीन मुंबई राज्याच्या भागात रद्द केले जातील, जे १ नोव्हेंबर १९५६ पूर्वी मध्य प्रदेश, हैदराबाद, सौराष्ट्र आणि कच्छ या राज्यांचे भाग होते".

गुजरात उच्च न्यायालयाने ठरवले की सौराष्ट्र उच्च न्यायालयात सहायक न्यायाधीशांच्या निकालावरून उत्तरवादींनी दाखल केलेली अपील १९४८ च्या सौराष्ट्र अध्यादेश क्रमांक २, च्या कलम २२ ए च्या तरतुदींच्या अधीन होती आणि आहे आणि न्या. व्यास यांनी हे प्रकरण द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे अपील करण्या योग्य आहे असे प्रमाणित केले तरच सदर न्यायनिर्णयाच्या विरोधात अपील केली जाऊ शकते निर्णयाविरुद्ध अपील फक्त ते प्रमाणित केले तरच चालेल की प्रकरण विभागीय खंडपीठात अपीलासाठी योग्य आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटच्या खंड १५ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की:

> "आणि आम्ही पुढे अध्यादेश जारी करतो की, बंगालमधील फोर्ट विलियम येथील उक्त उच्च न्यायालयाकडे एकल न्यायाधीशाचा किंवा कोणत्याही द्वि

सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाच्या न्यायालयाच्या एका न्यायाधीशाचा निकाल (अपीलीय अधिकारक्षेत्राचा वापर करून पारित केलेला निर्णय किंवा उक्त उच्च न्यायालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या न्यायालयाने अपीलीय अधिकारक्षेत्राच्या अंमलबजावणीत पारित केलेला हुकूमनामा किंवा आदेश आणि पुनरिक्षणात्मक अधिकारक्षेत्राच्या अंमलबजावणीत पारित आदेश नसताना आणि गव्हर्नमेंट ऑफ इंडिया च्या कलम १०७ अंतर्गत अधिक्षण अधिकाराच्या अंमलबजावणीत पारित केलेला वा जारी केलेला शिक्षा किंवा आदेश नसताना आणि फौजदारी अधिकारक्षेत्राच्या अंमलबजावणीत पारित केलेला आदेश नसताना) सौराष्ट्र उच्च न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल आणि यापूर्वी प्रदान केलेल्या कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता उक्त उच्च न्यायालयाकडे एकल न्यायाधीशाचा किंवा कोणत्याही द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाच्या न्यायालयाच्या एका न्यायाधीशाचा निकाल (अपीलीय अधिकारक्षेत्राच्या अंमलबजावणीत पारित केलेला निकाल नसताना आणि उक्त उच्च न्यायालयाच्या अधीक्षणाखाली असलेल्या न्यायालयाने अपीलीय अधिकारक्षेत्राच्या अंमलबजावणीत पारित केलेला हुकूमनामा किंवा आदेश) सौराष्ट्र उच्च न्यायालयाकडे अपील दाखल करण्यायोग्य, जिथे निकाल पारित करणारे न्यायाधीश घोषित करतात की तो अपीलासाठी योग्य आहे; परंतु उक्त उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या किंवा अशा द्वि सदस्यीय न्यायालयाच्या इतर निकालांमधून अपीलाचा अधिकार आमच्याकडे, आमच्या वारसदारांकडे किंवा आमच्या उत्तराधिकाऱ्यांकडे असेल........."

लेटर्स पेटंटच्या खंड १५ अंतर्गत मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांकडून दाखल केलेल्या दिवाणी प्रकरणातील अपीलात दिलेला निकाल हा द्वि सदस्यीय खंडपीठासमक्ष अपील करण्यास पात्र असतो, परंतु न्यायालयाच्या पुनर्विलोकन अधिकारक्षेत्राच्या अंमलबजावणीत किंवा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५ च्या

कलम १०७ अंतर्गत अधीक्षणाच्या अधिकाराच्या अंमलबजावणीत (संविधानाच्या अनुच्छेद २२७) पारित केलेला आदेश या बाबतीत अपवाद आहे. न्यायमूर्ती व्यास, यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति म्हणून काम करताना अपीलावर निर्णय दिला होता. प्रथमदृष्ट्या, अधीनस्थ न्यायालयाच्या निकालावरून पहिल्या अपीलात त्यांनी दिलेला निकाल हा मुंबई उच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठा समक्ष अपील करण्यास पात्र होता.

> १९४८ च्या सौराष्ट्र अध्यादेश क्रमांक २च्या कलम २२ ए आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटच्या खंड १५ मध्ये स्पष्टपणे विसंगती होती. कलम २२अ (२) च्या तरतुदीनुसार, "अपीलीय अधिकारक्षेत्राच्या अंमलबजावणीत पारित केलेल्या हुकूमनामा किंवा आदेशाच्या बाबतीत एकल न्यायाधीशाचा निकाल सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या द्वि सदस्यीय खंडपीठा समक्ष अपीलास पात्र होता, जेव्हा हुकूमनामा किंवा आदेश पारित करणारे न्यायमूर्ति प्रमाणित करतात की प्रकरण अपीलासाठी योग्य आहे." विधिमंडळाने पहिले अपील, दुसरे अपील, आदेशाविरुद्ध अपील (Appeal from Order) आणि पुनरिक्षण अधिकारक्षेत्राच्या अंमलबजावणीत दाखल केलेल्या अर्जामध्ये कोणताही भेद केला नाही. परंतु मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटच्या खंड १५ अंतर्गत प्रथम न्यायालयाच्या न्यायनिर्णयाविरुद्ध ज्या न्यायाधिशांसमक्ष सुनावणी झाली नाही अश्या न्यायाधीशांच्या प्रमाणपत्राशिवाय अपील दाखल केले जाऊ शकते.

हुकूमनामा किंवा आदेशावरून अपील करण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे. त्याच्या परिणामतः, न्यायालयाच्या हुकूमनाम्याला वरिष्ठ न्यायालयाच्या हस्तक्षेपापासून संरक्षित ठेवण्याचा अधिकार आणि केवळ त्यातील मर्यादांच्या अधीन राहून हा देखील निहित अधिकार आहे आणि तो स्पष्ट अधिनियम किंवा सुधारित

कायद्याच्या स्पष्ट परिणामाद्वारे घेऊन जाऊ शकतो. कोलोनियल शुगर रिफायनिंग कंपनी - विरुद्ध - इरविंग[1] या प्रकरणात न्यायिक समितीने असे ठरवले की, चालू असणाऱ्या दाव्यातील दावा दाखल करणाऱ्यास न्यायाधिकरणासमक्ष अपील करण्यापासून वंचित ठेवणारी तरतूद, जी त्याला अधिकार म्हणून होती, ती प्रक्रिया नियंत्रित करत नाही. ऑस्ट्रेलियन कॉमनवेल्थ जुडीशियरी अधिनियम , १९०३ हा अधिनियम २५ ऑगस्ट १९०३ रोजी लागू झाला. क्वीन्सलँडच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावरून २५ ऑक्टोबर १९०२ रोजी सुरू झालेल्या खटल्यात न्यायिक समितीकडे अपील करण्याची अनुमती मागण्याकरीता अर्ज करण्यात आला आणि ४ सप्टेंबर १९०३ रोजी अनुमती देण्यात आली. न्यायिक समितीकडून अपीलाची सुनावणी घेताना उत्तरवादींनी अर्ज केला की, ऑस्ट्रेलियन कॉमनवेल्थ जुडीशियरी अधिनियम , १९०३ च्या कलम ३९ अंतर्गत कनिष्ठ न्यायालयाच्या अपील करण्यासाठीची परवानगी देण्यासाठीची तरतूद निरकृत करण्यात आली आहे या कारणास्तव क्वीन्सलँडच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाविरुद्ध अपील फेटाळून लावावे. न्यायिक समितीने हा अर्ज फेटाळला. लॉर्ड मॅकनॅग्टन यांनी असे निरीक्षण केले कि:

> “प्रकरणाला लागू होणाऱ्या सामान्य तत्त्वांच्या बाबतीत कोणताही वाद नाही. एकीकडे, जर प्रश्न असलेला विषय हा केवळ प्रक्रियांचा विषय असेल तर याचिका (फेटाळण्यासाठी) तर्कशुद्ध आहे हि बाब वादग्रस्त नाही. दुसरीकडे, जर तो केवळ प्रक्रियांचा विषय नसून न्यायपालिका अधिनियमाच्या पारित होण्याच्या वेळी अस्तित्वात असलेल्या अधिकाराशी संबंधित असेल, तर लॉर्ड कोकपासून आजपर्यंतच्या न्यायनिर्णयाच्या दीर्घ साखळीनुसार असे मान्य करण्यात आले आहे की अपीलकर्त्या (शुगर कंपनी) जिंकण्यास पात्र असतील. न्यायपालिका अधिनियम हा स्पष्ट अधिनियम किंवा आवश्यक हेतुद्वारे भूतलक्षी नाही. आणि म्हणून हा एकमेव प्रश्न आहे की अधिनियमाच्या पारित होण्याच्या

1 (१) [१९०५] ए. सी. ३६९

तारखेला अपीलकर्ते यांच्याकडे निहित असलेला अधिकार हा महामहिम राजाच्या परिषदेकडे अपील करण्याचा अधिकार होता की तो केवळ प्रक्रियेचा विषय होता? न्यायमूर्तींना असे वाटते की हा प्रश्न संशयाची कबुली देत नाही. प्रलंबित प्रकरणातील वादीला उच्च न्यायधिकरणासमक्ष अपील करण्यापासून वंचित ठेवणे हा त्याचा अधिकार होता, या प्रक्रियांचे नियमन करण्यापेक्षा हा बराच वेगळा विषय आहे."

गरिकापत्ती वीरय्या - विरुद्ध - एन. सुब्बय्या चौधरी[1] (१९५७ एस्. सी. आर. ४८८) या प्रकरणात, या न्यायालयाने कोलोनियल शुगर रिफायनिंग कंपनी[2] प्रकरणातील (१९०५ ए. सी. २६९) तत्त्व स्वीकारले. त्यामुळे, विरुद्ध तरतुदीच्या अभावी, १९५१ मध्ये जेव्हा ते प्रकरण सुरू झाले तेव्हा हक्क कार्यवाहीशी संबंधित होते की, सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाच्या निर्णयाविरुद्ध अपील फक्त तेंव्हाच दाखल करता येईल जेव्हा प्रकरणाचा निर्णय देणारा न्यायाधीश प्रकरणाला अपील करण्यायोग्य असल्याचे प्रमाणित करेल. परंतु सौराष्ट्र उच्च न्यायालय १ नोव्हेंबर १९५६ पासून बंद करण्यात आले आणि सौराष्ट्र उच्च न्यायालया अधिकारक्षेत्र मुंबई उच्च न्यायालयाकडे देण्यात आले. हे प्रकरण न्या. व्यास यांनी सौराष्ट्र उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नव्हे तर मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून चालविले. कलम २२ ए अंतर्गत निर्बंध ठेवलेल्या अति ह्या सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींपैकीं एका न्यायमूर्तिच्या निकालाला लागू होते: ते मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या निकालाला लागू होत नाही. १९४८ च्या सौराष्ट्र अध्यादेश क्रमांक २, निरसीत करण्यात आला आणि अपीलाचे अधिकारक्षेत्र मुंबई उच्च न्यायालयाकडे देण्यात आले तेव्हा, मुंबई उच्च न्यायालयाने ठरवलेल्या प्रकरणातील पक्षांनी वापरले जाणारे अपील करण्याचा अधिकार त्या न्यायालयाच्या लेटर्स पेटंटद्वारे नियंत्रित होता, १९४८ चा सौराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ च्या कलम २२ ए द्वारे नाही . कलम २२ ए अंतर्गत विहित

1 (१) [१९५७] एस. सी. आर. ४८८
2 (२) १९०५ ए. सी. ३६९

केलेली घटना प्रकरणाशी जुळते आहे असे मान्य केले तरी, सौराष्ट्र अध्यादेशाच्या कलम २२ ए च्या तरतुदी मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या निकालांना नियंत्रित करणाऱ्या लेटर्स पेटंटच्या खंड १५ अंतर्गत वापरल्या जाणाऱ्या अपील करण्याचा अधिकार प्रतिबंधित करू शकत नाही. कोलोनियल शुगर रिफायनिंग कंपनी[2] प्रकरणातील नियमास अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने अध्यादेशाच्या कलम २२ ए मधील "उच्च न्यायालयाचे न्यायाधीश" म्हणजे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असा अर्थ लावता येणार नाही. केंद्र सरकारने सुस्पष्ट अभिप्रेत अर्थान्वये निरकृत केलेल्या सौराष्ट्र (केंद्रीय विषयांवरील कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९५७ आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटच्या खंड १५ च्या प्रख्यापित स्पष्ट परिणामाद्वारे, न्या. व्यास यांचा निकाल अपील दाखल करण्यास सक्षम असल्याचे प्रमाणित केलेल्या न्यायाधीशाच्या आदेशाशिवाय द्वि सदस्यीय न्यायाधीशाच्या खंडपीठासमक्ष अपील करण्यास पात्र होता.

उत्तरवादींच्या वकिलांनी आपल्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ १९५६ च्या राज्य पुनर्रचना अधिनियम च्या कलम ५२ च्या तरतुदींचा आधार घेतला. परंतु सदर कलम केवळ १ नोव्हेंबर १९५६ नंतर मुंबई उच्च न्यायालयाला मूळ, अपील आणि इतर अधिकारक्षेत्र प्रदान करते, जे सौराष्ट्र उच्च न्यायालयाने १ नोव्हेंबर १९५६ च्या आधी सौराष्ट्र राज्यातील प्रदेशांच्या बाबतीत वापरले जात होते. सदर कलम १९४८ च्या सौराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ च्या कलम २२ ए (२) अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या मर्यादा मुंबई उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटमध्ये स्पष्टपणे किंवा कोणत्याही परिणामाद्वारे समाविष्ट करत नाही. सौराष्ट्र राज्याच्या प्रदेशांच्या बाबतीत सौराष्ट्र उच्च न्यायालय १ नोव्हेंबर १९५६ च्या पूर्वी वापरू शकत असलेले अधिकारक्षेत्र - मूळ, अपील आणि इतर - मुंबई उच्च न्यायालयाकडे उत्तरजीवीत राहिले आणि आणि राज्य पुनर्रचना अधिनियमाच्या कलम ५९ च्या उप-कलम (३) च्या तरतुदींनुसार जे उत्तरवादिने सौराष्ट्र न्यायालयासमक्ष दाखल केलेले अपील सुनावणी योग्य होते ते मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील

अधिकारक्षेत्राच्या न्यायालयाकडे हस्तांतरित करण्यात आले. न्या. व्यास यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति म्हणून काम केले आणि त्यांचे प्रथम अपीलातील निकाल हे, विरुद्ध तरतुदीच्या अभावी, स्पष्टपणे प्रमाणित न करता द्वि सदस्यीय न्यायाधीशाच्या खंडपीठा समक्ष लेटर्स पेटंटच्या खंड १५ अंतर्गत अपीलास पात्र होते.

गुजरात उच्च न्यायालय असे गृहीत धरण्यात बरोबर होते की, अगोदरच्या सौराष्ट्र राज्याच्या प्रदेशांच्या बाबतीत, मुंबई उच्च न्यायालयाने सौराष्ट्र उच्च न्यायालयाकडे असलेले तेच अधिकारक्षेत्र प्राप्त केले. तथापि, याचा अर्थ असा होत नाही की "नियुक्त दिवशी म्हणजे १ नोव्हेंबर १९५६ रोजी लागू असलेल्या कायद्याच्या संदर्भात" अधिकारक्षेत्र नियंत्रित करावयाचे होते. राज्य पुनरर्चना अधिनियमाच्या कलम ५२ ने नियुक्त दिवसाच्या अगोदर लागू असलेल्या कायद्यानुसार मूळ, अपील आणि इतर अधिकारक्षेत्र जे सौराष्ट्र राज्याच्या हद्दीतील प्रदेशांच्या बाबतीत वापरले जात होते ते जतन केले. त्यावेळी लागू असलेल्या कायद्यानुसार कोणतीही मर्यादा अधिकारक्षेत्र वापरताना स्पष्ट तरतुदीद्वारे किंवा स्पष्ट अर्थनिर्वाचकतेद्वारे जतन केले गेले नसतील तर, लेटर्स पेटंटच्या खंड १५ च्या तरतुदी लागू होणे आवश्यक आहे.

१९५६ च्या राज्य पुनर्रचना अधिनियमा च्या कलम ५७ च्या तरतुदी चे स्मरण करून देणे आवश्यक आहे, ज्यात असे नमूद केले आहे की संबंधित राज्याच्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ति, एकल न्यायाधीश आणि द्वि सदस्यीय खंडपीठांच्या अधिकारांशी संबंधित आणि अधिकारांच्या अंमलबजावणीशी संबंधित बाबींशी संबंधित कायदा, नवीन राज्याच्या उच्च न्यायालयाच्या बाबतीत आवश्यक बदलांसह लागू करतील. १ नोव्हेंबर १९५६ रोजी च्या तात्काळ अगोदर प्रथम अपीलाची सुनावणी घेत असलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाच्या निकालास प्रमाणित न करता द्वि सदस्यीय खंडपीठात अपील दाखल करता येऊ शकत शकत होते. सौराष्ट्र उच्च न्यायालयाकडून मुंबई उच्च न्यायालयाकडे कलम ५९ (३) अंतर्गत वर्ग करण्यात

आलेल्या प्रकरणांशी संबंधित असताना मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी अपिलांची सुनावणी घेण्याचे अधिकार कायम ठेवले. कलम ५७ च्या तरतुदींनुसार संबंधित राज्यासाठी म्हणजे नवीन मुंबई राज्यासाठी उच्च न्यायालयाच्या द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाचे अधिकार हे मुंबई राज्यात नियुक्त दिवसाच्या निकटपूर्वी लागू असलेल्या कायद्याअंतर्गत द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाच्या अधिकारांसारखेच असतील. मुंबई उच्च न्यायालयाच्या द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाला अधीनस्थ न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध प्रथम अपील निर्णीत करण्याऱ्या एकल न्यायाधीशाद्वारे घोषित केलेल्या प्रमाणपत्राशिवाय अपिलाची सुनावणी घेण्याचे अधिकार होते.

गुजरात उच्च न्यायालयाने "अधिकार" आणि "अधिकारक्षेत्र" यांच्यात फरक केला आहे आणि त्यांनी असे मत व्यक्त केले आहे की, १९५६ च्या राज्य पुनर्रचना अधिनियमा च्या कलम ५२ मध्ये नवीन मुंबई राज्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या अपीलीय न्यायाधिकाराची सौराष्ट्र भागाच्या बाबतीत सौराष्ट्र उच्च न्यायालयाकडे असलेल्या न्यायाधिकारासारखीच असल्याचे नमूद केले आहे, याचा अर्थ जो सौराष्ट्र उच्च न्यायालयाकडे न्यायाधिकार आहे तोच मुंबई उच्च न्यायालयाकडे आहे आणि त्या न्यायाधिकाराच्या अंमलबजावणीत मुंबई उच्च न्यायालय हे सौराष्ट्र उच्च न्यायालयाच्या अधीन असलेल्याच मर्यादांच्या अधीन आहे. आम्ही या मताशी सहमत होऊ शकत नाही. १९५६ च्या राज्य पुनर्रचना अधिनियमा च्या कलम ५२ मध्ये असे नमूद नाही आणि त्याच अधिनियमाच्या कलम ५७ मध्ये विरुद्ध तरतूद नमूद आहे. गुजरात उच्च न्यायालयाचे असेही मत होते की, १९५६ च्या राज्य पुनर्रचना अधिनियमा च्या कलम ५२ च्या अंतर्गत केवळ मुंबई उच्च न्यायालयात समाविष्ट असलेल्या प्रत्येक क्षेत्राच्या प्रादेशिक न्यायाधिकारांच्या संदर्भातच "कायदा स्पष्ट करते" निश्चित केले आहे आणि जर विधिमंडळाने मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकाराचा विस्तार केला आणि रद्द करण्यात आलेल्या उच्च न्यायालयाकडे असलेले न्यायाधिकारही कायम

ठेवले, तर परिणाम "विचित्र आणि विरोधाभासी" होईल आणि परिणामतः न्यायाधिकारात संघर्ष होईल. परंतु, आमच्या मते, हा असा निष्कर्ष काढण्याचा आधार आहे की, मुंबई उच्च न्यायालयाचा न्यायाधिकार सौराष्ट्र प्रदेशाच्या बाबतीत मूळ उच्च न्यायालयाकडून न्यायाधिकाराच्या वापरावरील मर्यादांवर मात करतो, आणि मुंबई उच्च न्यायालयाचा न्यायाधिकार कोणत्याही व्यक्त न केलेल्या मर्यादेमुळे प्रतिबंधित नाही.

गुजरात उच्च न्यायालयाने असे मान्य केले की ते ज्या निष्कर्षापर्यंत पोहोचले त्यात न्याय प्रशासनातील दोष उघड झाला आहे. त्यांनी असे अवलोकन केले की : त्यांनी असे अवलोकन केले की :

> "प्रलंबित प्रकरणांच्या बाबतीत सौराष्ट्र उच्च न्यायालयाचा जुना न्यायाधिकार अबाधित ठेवण्यासाठी विधिमंडळाकडे चांगला कारण असू शकतो. तथापि, पुनर्रचना अधिनियम लागू झाल्यानंतर दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांवर आमच्या निष्कर्षाचा परिणाम होतो. आमच्या मते, सौराष्ट्र आणि कच्छ भागातील वादग्रस्तांना आता जुन्या मुंबई भागातील वादग्रस्तांपेक्षा वेगळ्या पद्धतीने वागवण्याचे कोणतेही कारण नाही. आमच्या मते, सर्व भागातील वादग्रस्तांच्या अपील करण्याच्या अधिकारांची समानता राखणे आवश्यक आहे. संबंधित अधिकाऱ्यांना ही बाब तपासण्याची आणि आवश्यक असल्यास, सौराष्ट्र आणि कच्छ भागातील वादग्रस्तांना गुजरात राज्यातील इतर वादग्रस्तांप्रमाणेच अपील करण्याचे समान अधिकार देण्यासाठी आवश्यक कायदा करण्याची आम्ही शिफारस करतो."

आमच्या मते, "सौराष्ट्र उच्च न्यायालयाचा जुना न्यायाधिकार" प्रलंबित प्रकरणांच्या बाबतीत कलम ५२ अंतर्गत जतन केल्या गेल्या संबंधीचा निष्कर्ष चुकीचा आहे. १९५६

राज्य पुनर्रचना अधिनियम, न्यायाधिकार वापरण्यावरील मर्यादा जतन करणे हे अभिप्रेत करत नाही आणि "नियुक्त दिवसाच्या आधी लागू असलेल्या कायद्यानुसार मूळ, अपील आणि इतर न्यायाधिकार" या शब्दार्थाच्या वापरामुळे कोणतीही अर्थनिर्वाचकता उद्भवत नाही, न्यायाधिकार वापरण्यावरील १ नोव्हेंबर १९५६ रोजी अस्तित्वात असलेल्या मर्यादा, राज्य पुनर्रचना अधिनियमाच्या कलम ५७ च्या तरतुदी न जुमानता, जतन करण्यात आल्या.

गुजरात उच्च न्यायालयाने दिलेला आदेश रद्दबातल करण्यात आला आहे आणि प्रकरण मूळ क्रमांकाखाली पुन्हा प्रविष्ट करण्यासाठी आणि कायद्यानुसार सुनावणी घेण्यासाठी आणि निकाली काढण्यासाठी उच्च न्यायालयाकडे परत पाठविण्यात येत आहे. खर्च हा उच्च न्यायालयातील खर्च असेल.

अपील मंजुर करण्यात येते आणि प्रकरण परत पाठवण्यात येते.

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."